MHAH080022712021

<u>**नियमीत दिवाणी दावा क्रमांक ११२३/२०२१ मधील निशाणी १७(अ) वरील आदेश.**</u>

१. प्रतिवादी क्र.१ यांनी प्रस्तुत अर्ज त्यांच्याविरूध्द झालेला 'विनाकैफियत' आदेश बाजूला सारण्याकरिता दाखल केलेला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, दाव्यात प्रतिवादी क्र. १ ते ६ हे हजर झाले आहेत. दाव्यात तडजोडीचे बोलणे चालु होते, त्यामुळे त्यांना प्रस्तुत दाव्यात वेळेत कैफियत देण्यास उशीर झाला. दरम्यान त्यांच्याविरूध्द 'विनाकैफियत' आदेश पारीत झाला, ते प्रस्तुत दाव्यास कैफियत देवू इच्छीतात, सबब, त्यांच्याविरूध्द पारीत 'विनाकैफियत' आदेश बाजूला सारण्यात येवुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

२. वादीने प्रस्तुत अर्जास विरोध करीत म्हणणे दिलेले आहे की, अर्ज खरा व बरोबर नाही तसेच अर्जावर प्रतिवादी क्र. १ व त्याचे वकिलांची सही नसल्याने अर्ज अपुर्ण आहे. सबब, अर्ज नामंजुर करावा.

३. अर्ज व त्यावरील म्हणणे पाहिले. दाव्याचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुत दावा प्रतिवादीं विरुध्द वाटपासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ विरूध्द विनाकैफियत आदेश पारीत झालेला आहे. दाव्याचे स्वरूप पाहता त्यांचेविरूध्द झालेला 'विनाकैफियत' आदेश बाजूला सारणे उभय पक्षकारांतील दिवाणी वादाच्या समुळ निराकरणाकरिता आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.१ यास कैफियत देण्याची संधी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु याकामी झालेला उशिर पाहता योग्य ती खर्चाची रक्कम प्रतिवादीवर बसविणे न्यायोचीत होणार आहे. प्रतिवादी क्र. १ ने अर्जासोबत कैफियत दाखल केली आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ ने निशाणी ३३ अन्वये सदर अर्जावर सही करण्याची परवानगी मागितली व ती मंजुर करण्यात आली. परिणामी खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१) अर्ज प्रतिवादी क्र.१ वर खर्चाची रक्कम रु.५००/-(पाचशे रुपये मात्र) लादुन मंजुर करण्यात येतो. प्रतिवादीने खर्चाची रक्कम वादी यांस दयावी.

२) प्रतिवादी क्र.१ विरूध्द झालेला 'विनाकैफियत' आदेश बाजूला सारण्यात येतो.

३) प्रतिवादी क्र.१ ने खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

४) उभय पक्षकारांनी आदेशाची नोंद घ्यावी.

KADUSKAR DEEPALI PARIMAL
Digitally signed by KADUSKAR DEEPALI PARIMAL
Date: 2026.01.03 16:43:54 +0530

ठिकाण– संगमनेर
दिनांक– ०३.०१.२०२६

(श्रीमती डी.पी.कडुस्कर)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
संगमनेर, जि.अहमदनगर.